दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४९ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# आदिवासी आश्रमशाळांचा दर्जा सुधारण्यासाठी नियंत्रण समिती-डॉ.अशोक उईके

## आदिवासी विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहात अत्याधुनिक सुविधा; शिक्षण क्षेत्रातील विविध संस्थाचे मार्गदर्शन

## नविन शिक्षण धोरणानूसार उपक्रमांची आखणी; रविंद्र ठाकरे यांनी सुरू केलेले उपक्रम कायम राहणार

**नागपूर । प्रतिनिधी**

अतिदुर्गम भागात राहणारा आदिवासी समाज आपल्या संस्कृतीचे संवर्धन करत असला तरी शिक्षणापासून वंचित राहणार नाही. यासाठी शिक्षणाच्या सर्व सुविधा आश्रमशाळांच्या माध्यमातून त्यांच्या पर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. आश्रमशाळा तसेच वस्तीगृहामध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये वाढ करतांनाच आश्रमशाळांचा दर्जा वाढविण्यासाठी नियंत्रण समिती तयार करण्यात येणार असल्याची घोषणा आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईक यांनी केली.




वनामती येथील सभागृहात आदिवासी विकास विभागातर्फे नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे सादरीकरण तसेच यासाठी सहाय्य करणाऱ्या संस्थांचा गौरव समारंभ आदिवासी विकास मंत्री यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री शंकरबाबा पापळकर होते. यावेळी अतिरिक्त आदिवासी उपायुक्त रविंद्र ठाकरे, उपायुक्त दिगंबर चव्हाण, प्रकल्प अधिकारी रंजित यादव (गडचिरोली), कुशल जैन (अहेरी), दिपक हेडाऊ (वर्धा), विकास राचेलवार (चंद्रपूर), प्रविण लाटकर (चिमूर), निरज मोरे (भंडारा), उमेश काशीद (देवरी), उपसंचालक डॉ. पुरूषोत्तम मडावी, शिवराम भलावी, दिनेश शेराम, डॉ. गोडवते, अधिक्षक अभियंता उज्वल डाबे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. पद्मश्री मिळाल्यानंतर शंकरबाबा पापळकर व रविंद्र ठाकरे यांचा सेवानिवृत्तीनिमीत्त गौरव करण्यात आला.आदिवासींच्या जिवनात आर्थिक व सामाजिक परिवर्तना सोबतच संपूर्ण समाज शैक्षणिकदृष्ट्या प्रगत होईल यादृष्टीने काम करण्याची आवश्यकता असून आदिवासी विभागाची अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांनी मागिल चार वर्षात विविध उपक्रमांच्या माध्यमातून या समाजाच्या सर्वांगिन विकासाला प्रोत्साहन दिले आहे. आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवावी यासाठी बोलका वर्ग, ब्रायटर माईंड आदी शैक्षणिक उपक्रम राबविले. याउपक्रमामुळेच अनेक विद्यार्थी गुणवत्त यादीत येवू शकले. त्यांनी सुरू केलेले सर्व उपक्रम यापुढेही कायम सुरू राहतील असा विश्वास आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके यांनी व्यक्त केला.आदिवासी विभागाच्या अंतर्गत असलेल्या सर्व आश्रमशाळा व वस्तीगृहामध्ये विद्यार्थ्यांसाठीच्या सुविधांमध्ये आमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. नविन अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांना अत्याधुनिक पद्धतीचे शैक्षणिक साहित्य पुरविणे आवश्यक आहे. वस्तीगृहामध्ये असलेल्या सोयी व सुविधा कशा वाढविता येईल यासाठी प्रत्येक आश्रमशाळेसाठी नियंत्रण समिती तयार करण्यात यावी व ही समिती नियमीत विद्यार्थ्यांसोबत संवाद साधेल तरच प्रत्येक आदिवासी मुलाला शैक्षणिक सुविधा उपलब्ध होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आदिवासी आश्रमशाळांच्या शैक्षणिक उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या विविध संस्था व व्यक्तींचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी आदिवासी समाज हा प्रमाणिक व मेहनती असल्यामूळे जंगलांच्या संवर्धनासाठी महत्वाची भुमिका बजावत आहे. आदिवासी भागात शिक्षणाच्या सुविधा निर्माण करून दर्जेदार शिक्षण मिळेल यासाठी विभागाने पुढाकार घेण्याची आवश्यकता व्यक्त केली. आदिवासी भागातील प्रत्येक मुलगा शाळेत येईल. यासाठी उपाययोजना कराव्यात असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## भक्तांना मिळणार पाच लाखापर्यंतचे विमा संरक्षण

**शिर्डी**–शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी दरवर्षी देशभरातून लाखो भाविक येत असतात. मात्र, अनेक वेळा दर्शनासाठी येताना किंवा परत जात असताना भाविकांना छोट्या-मोठ्या दुर्घटनांना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर साई संस्थानने गुढी पाडव्याच्या दिवशी साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता साईभक्तांना पाच लाख रुपयांपर्यंत विमा संरक्षण देण्याचा निर्णय शिर्डीतील साई संस्थानच्या वतीने घेण्यात आला आहे.

### सुटीची सुचना

मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ रोजी दै.सह्याद्रीचा राखणदार कार्यालयास सुटी राहील. त्यामुळे दि.२ एप्रिल रोजीचा अंक प्रकाशीत होणार नाही. वाची वाचकांनी नोंद घ्यावी..

# रामनवमी शोभायात्रेच्या पार्श्वभुमीवर पालकमंत्र्यांकडून आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सर्वधर्मीय सण उत्सवाचे आयोजन होणार आहे. त्या अनुषंगाने आज (दि.३१) राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी रामनवमी शोभायात्रेनिमित्त जिल्हा प्रशासन आणि आयोजन समितीचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, आयोजन समितीचे अध्यक्ष योगेश भंडारी, उपाध्यक्ष डॉ. अशोक जिवतोडे, शैलेश बागला आदी उपस्थित होते. रामनवमी शोभायात्रेनिमित्त आयोजन समिती आणि जिल्हा प्रशासनामध्ये समन्वय रहावा, या उद्देशाने आजची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, रामनवमी हा उत्सव सर्व भाविकांच्या श्रध्देचा आणि भावनेचा विषय आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाचे यासाठी संपूर्ण सहकार्य राहील. अतिशय उत्साहात आणि आनंदात रामनवमी साजरी करावी. रॅलीची वेळ वाढवून मिळण्याबाबत



विचार-विमर्श करून आणि नियमानुसार निर्णय घेण्यात येईल. शासन - प्रशासनाच्या नियमांचे कुठेही उल्लंघन होणार नाही, याची दक्षता सर्वांनी घेणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जिल्ह्यात साज-या होणा-या सर्वधर्मीय सणांबाबत नुकतीच जिल्हास्तरीय शांतता समितीची बैठक घेण्यात आली. चंद्रपूर जिल्हा हा शांतताप्रिय जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्याचा हाच लौकिक कायम राहण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणेला आणि शांतता समितीच्या सदस्यांना सुचना देण्यात आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.मनपा आयुक्त विपीन पालिवाल म्हणाले, शहरातील रस्त्यांची कामे युध्दस्तरावर सुरू असून शोभायात्रेपर्यंत रस्ता वाहतुकीसाठी मजबुत करून दिला जाईल. तसेच फॉगिंग मशीनने रस्त्यावरील धूळ खाली बसण्यासाठी पाण्याचे फवारे मारण्यात येईल. सोबतच रस्त्याची स्वच्छता आदी कामे मपनाने हाती घेतली आहेत.यावेळी आयोजन समितीच्या सदस्यांनी देखील सुचना केल्या. बैठकीला विश्वास माधशेट्टीवार, रोडमल गहलोत, डॉ.गोपाल मुंधडा, अजय वैरागडे, जीतेन्द्र जोगड़, रविन्द्र गुरुनुले, अमित विश्वास, आशिष मुंधडा, प्रवीण खोब्रागडे, सुहास दानी, विजय डोमलवार, लखनसिंग चंदेल, विवेक होकम आदी उपस्थित होते.

## पालकमंत्र्यांच्याहस्ते शाळांना बक्षिस वितरण

# सुंदर शाळा उपक्रमातून भौतिक सुविधांसह शाळांमध्ये गुणात्मक बदल-पालकमंत्री संजय राठोड

## 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रम

**यवतमाळ । प्रतिनिधी**

तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम सुरु करण्यात आला. शाळांमध्ये भौतिक सुविधा निर्माण होण्यासोबतच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि त्यांच्यात गुणात्मक बदल घडविण्यासाठी हा उपक्रम अतिशय उपयुक्त ठरला आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले.पालकमंत्र्यांच्याहस्ते मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत शाळांना बक्षिस वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ.प्रशांत गावंडे यांच्यासह पुरस्कार प्राप्त तालुक्यातील शाळांचे गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, खाजगी शाळा व्यवस्थापन संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शाळांनी चांगले काम केले आहे. या उपक्रमामुळे आदर्श शैक्षणिक वातावरण निर्माण होत आहे. शाळांना भौतिक सुविधा तर उपलब्ध होत आहेतच शिवाय गुणात्मक बदल यातून दिसतो आहे.





शाळा केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था नाहीत तर विद्यार्थ्यांना सर्वार्थाने घडविणारे ज्ञानाचे केंद्र आहे. त्यामुळेच खनिज विकास निधीतून जिल्ह्यातील शाळा मॉडेल केल्या जात असल्याचे पालकमंत्री पुढे बोलतांना म्हणाले.

शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी भविष्याची भावी पिढी आहे. या पिढीच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच त्यांच्यात नैतिक मुल्यांची जोपासणा होणे देखील आवश्यक आहे. जिल्ह्यातील शाळांना आवश्यक्ता असल्यास डेस्क बेंच उपलब्ध करून देऊ. शैक्षणिक सुविधांसाठी जिल्हा परिषदेकडून येणाऱ्या प्रस्तावांना आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, त्यात कोणत्याही प्रकारची कमतरता येणार आहे, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, प्राचार्य प्रशांत गावंडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी पालकमंत्र्यांच्याहस्ते उपक्रमांतर्गत उत्कृष्ट शाळांना पुरस्कार देण्यात आले. त्यात सन २०२३-२४ या वर्षातील स्थानिक स्वराज्य संस्था शाळा गटात प्रथम उच्च प्राथमिक शाळा नागापूर, ता.उमरखेड, द्वितीय उच्च प्राथमिक शाळा मनपूर, ता.यवतमाळ, तृतीय प्राथमिक शाळा चालबर्डी, ता.पांढरकवडा व उच्च प्राथमिक शाळा मजरा, ता. मारेगाव यांना देण्यात आला. खाजगी व्यवस्थापन शाळा गटात प्रथम माणिकराव पांडे पाटील विद्यालय फाळेगाव, ता.बाभुळगाव, द्वितीय मोहनाबाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, दिग्रस, तृतीय लखाजी महाराज हायस्कुल झाडगाव, ता.राळेगाव यांना देण्यात आला.सन २०२४-२५ या वर्षातील स्थानिक स्वराज्य संस्था शाळा गटात प्रथम प्राथमिक शाळा सुकळी, ता.कळंब, द्वितीय उच्च प्राथमिक उर्दु शाळा मालखेड बु. ता.नेर, तृतीय उच्च प्राथमिक शाळा पिंपळापूर, ता.राळेगावचा समावेश आहे. खाजगी व्यवस्थापन शाळा गटात प्रथम महात्मा फुले विद्यालय उमरखेड, द्वितीय मातोश्री हायस्कुल महागाव तर तृतीय क्रमांकाचे बक्षिस उटुंबू इंग्रजी शाळा जांब, यवतमाळ यांना देण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन कैलास राऊत यांनी केले. यावेळी पुरस्कार प्राप्त शाळांसह जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वरोरा शहरात गुढीपाडवा उत्साहात साजरा

## रणरागिनींची लक्षवेधी बुलेट रॅली

## जीवनगौरव पुरस्काराचे वितरण

**वरोरा । प्रतिनिधी**

गांधी उद्यान योग मंडळ व गुढीपाडवा उत्सव आयोजन समितीच्या वतीने आयोजित गुढीपाडवा उत्सव वरोरा शहरात विविध कार्यक्रमांच्या आयोजन करून साजरा करण्यात आला.हिंदू नववर्षाच्या निमित्याने स्थानिक गांधीसागर तलावाचे प्रवेशद्वारावर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. यावेळी महिलांनी काढलेली टू व्हीलर व बुलेट रॅली मुख्य आकर्षण ठरले. खासदार प्रतिभा धानोरकर, आ करण देवतळे यांचे सह वरोरेकर मोठ्या प्रमाणात यात सहभागी झाले होते. बैलबंडीवर भव्य गुढी उभारून शहरातील मुख्य मार्गावरून गुढीपाडव्याची रॅली काढण्यात आली. यामध्ये आदिवासी नृत्य, ढोल ताशा ध्वज पथक, वारकरी पथक, महिलांचे लेझीम पथक आकर्षक होते. नागरिकांनी या मार्गावर रांगोळ्या काढून नववर्षाचे स्वागत केले. विविध सामाजिक संघटनांनी सरबत आणि अल्पहाराचे स्टॉल लावले होते.





सायंकाळी आंबेडकर चौक येथे संगीत रजनीचे आयोजन आणि वरोरारत्न जीवनगौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी अध्यक्षस्थानी लोकशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा श्रीकांत पाटील होते. सत्कारमूर्ती प्रसिद्ध उद्योजक प्रकाश मुथा, नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य वामन तुर्के, योगाचार्य प्रकाश संचेती, गांधी उद्यान योग मंडळाचे अध्यक्ष नरेंद्र नेमाडे आणि गुढीपाडवा आयोजन समितीचे अध्यक्ष नितेश जयस्वाल यांची उपस्थिती या वेळी होती.

आपले मनोगत व्यक्त करताना प्रा. श्रीकांत पाटील यांनी गांधी उद्यान योग मंडळाच्या कार्याचा आढावा घेत माणसांना जोडण्याचं काम योग मंडळ करीत असून त्यामुळे शहरात सांस्कृतिक वातावरण निर्माण झाल्याचे ते म्हणाले. वामन तुर्के यांनी वरोरा शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचा आलेख रसिकांच्या पुढे मांडला. याप्रसंगी प्रकाश मुथा यांना फटाक्याच्या आतिषबाजीत जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना जगात माणुसकी हा एकच धर्म असून प्रामाणिकपणे काम केल्यास आयुष्याचं भलं होतं असे सांगत, माणसाने सकारात्मक विचार, जिद्द आणि सचोटी याचा अवलंब करावा असे ते म्हणाले. भविष्यात सुसज्ज गोरक्षण उभे करण्याचा मानस त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रशांत खुळे यांनी केले. डॉ. पल्लवी ताजणे यांनी मानपत्राचे वाचन तर नरेंद्र नेमाडे यांनी आभार मानले. रसिक श्रोत्यांची मोठी उपस्थिती कार्यक्रमाला होती. गांधी उद्यान योग मंडळाचे मनोज कोहळे, आनंद गुंडावार, शैलेश शुक्ला, गणपत भडगरे, निलेश शुक्ला, योगेश डोंगरवार, प्रमोद गिल्लोरकर, प्रवीण सुराणा, जयंत मारोडकर, शशी चौधरी आदी सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता अथक परिश्रम घेतले.

# स्थानिकांना रोजगार द्या; ट्रक चालकांना पुन्हा सेवेत घ्या; युवासेनेची आरो माइनिंगला मागणी





**भद्रावती । प्रतिनिधी**

तालुक्यातील स्थानिकांना रोजगार न मिळणे आणि ट्रक चालकांना कामावरून कमी करण्याचा निर्णय अन्यायकारक असून, तत्काळ योग्य तो निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा आलेख रमेश रट्टे यांच्या नेतृत्वात युवासेना भद्रावती-वरोराच्या वतीने आरो माइनिंग व्यवस्थापनाला देण्यात आला. या मागणीसाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेटून निवेदन देण्यात आले.

भद्रावती तालुक्यातील तरुणांना कंपनीत रोजगाराच्या संधी मिळाव्यात आणि जे कामगार आधीच कार्यरत आहेत, त्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळावी, ही

### संघर्षाशिवाय न्याय नाही-आलेख रमेश रट्टे

**यावेळी बोलताना आलेख रमेश रट्टे म्हणाले, स्थानिक तरुणांना रोजगार द्यायला हवा, त्यांचा हक्क हिरावला जाणार नाही! जर कंपनीने योग्य निर्णय घेतला नाही, तर रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल. आम्ही शांत बसणार नाही.**

स्थानिकांची प्रमुख मागणी आहे. मात्र, या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने युवा सेना कार्यकारणी सदस्य हर्षल शिंदे यांच्या आदेशाने आलेख रमेश रट्टे यांच्या नेतृत्वाखाली युवासेनेच्या कार्यकर्त्यांनी हा मुद्दा उचलून धरला.आरो माइनिंगमध्ये काम करत असलेल्या काही ट्रक चालकांना अचानक सेवेतून कमी करण्यात आले, हा प्रकार पूर्णपणे अन्यायकारक असून, त्यांना त्वरित पुनर्नियुक्ती द्यावी, अन्यथा संघर्ष अटळ आहे, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला.

या निवेदनाच्या वेळी विधानसभा समन्वयक मुनेश्वर बदखल, अमोल पारोदे, वेदांत गजबंदे यांची उपस्थिती होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिले असले, तरी मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडले जाईल, असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.

# कोल्हारकरांनी जपली मंदिरा वरील ध्वज बदलण्याची परंपरा

## गुढीपाडव्याच्या उत्साहात भगव्या मिरवणुकीने स्वागत

**कोल्हार । प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कोल्हार भगवतीपूर येथील नागरिकांनी परंपरागत उत्साहात नववर्षाचे स्वागत केले. हातात भगवे झेंडे, डोक्यावर भगव्या टोप्या आणि सनई-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. गेल्या कित्येक वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार यंदाही गावातील सर्व मंदिरावरील जुने ध्वज उतरवून नवे ध्वज उभारण्यात आले. विजय आणि समृद्धीचे प्रतीक असलेल्या ग्रामध्वज गुढीचे पूजन करून नववर्षाचा शुभारंभ करण्यात आला. गावातील युवक, ग्रामस्थ, उद्योजक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी स्व. माधवराव खर्डे पाटील चौकात एकत्र आले. श्री भगवती माता मंदिराच्या भव्य स्वागत कमानीजवळ श्रीफळ अर्पण करून ध्वज मिरवणुकीस प्रारंभ झाला. पांढरा शर्ट, भगवी टोपी आणि उंचावलेले भगवे झेंडे घेऊन चालणारे नागरिक सर्वांचे आकर्षण ठरले. मिरवणुकीच्या मार्गावर गावाचे ग्रामदैवत श्री भगवती माता मंदिरासह सर्व मंदिरांवरील ध्वज बदलण्यात आले.



शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडलेल्या या मिरवणुकीची सांगता स्व. माधवराव खर्डे पाटील चौकात झाली.या वेळी ड. सुरेंद्र खर्डे पाटील आणि डॉ. जयराम खंडेलवाल यांच्या हस्ते ग्रामगुढीची स्थापना व पूजन करण्यात आले. ड. सुरेंद्र खर्डे पाटील म्हणाले, गावातील सामाजिक सलोखा आणि शांतता जपणे महत्त्वाचे आहे. देशभर भगव्या विचारधारेचे वातावरण आहे, मात्र सोशल मीडियामुळे ते दूषित होत आहे. अशा वेळी विवेकबुद्धीचा वापर करून एकत्र राहावे. हा कार्यक्रम समस्त हिंदू समाजाचा असून, आपले मतभेद विसरून एकत्र यावे.

कार्यक्रमात शिवाजी उदावंत, स्वप्निल निबे, संजय शिंगवी आणि श्याम गोसावी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अजित मोरे, डॉ. सुनिल खर्डे, ज्ञानेश्वर खर्डे, पंढरीनाथ खर्डे, अमोल खर्डे, विजय डेंगळे, अक्षय मोरे आणि गणेश गागरे यांचे विशेष योगदान राहिले. हिंदुत्ववादी संघटनांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा कोल्हार केंद्रात भक्तिमय वातावरणात साजरा



**कोल्हार । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र कोल्हार येथील राजुरी रोडवरील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. असंख्य स्वामी सेवेकऱ्यांच्या उपस्थितीत आणि भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक विधी पार पडले.सोहळ्याची सुरुवात सकाळी ८.३० वाजता भूपाळी आरतीने झाली. त्यानंतर सकाळी १०.३० वाजता नैवेद्य आरती संपन्न झाली. या शुभप्रसंगी सामूहिक श्री स्वामी समर्थ महाराज जप आणि श्री स्वामी चरित्र सारामृत पाठ वाचन सेवा मोठ्या भक्तिभावाने पार पडली. भाविक भक्तांनी श्रद्धेने या धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या सांगता औदुंबर प्रदक्षिणेने झाली. संपूर्ण सोहळा भक्तिरसात रंगून गेला होता. यावेळी स्वामी सेवेकरी सुधीर खर्डे, विजय डेंगळे, शेळके सर, गणेश सोमवंशी, सावंत साहेब, पल्लवी ताई धनवटे, लता ताई रोकडे, काळे ताई, सुनीता ताई भनगे, कल्पना ताई नेहे आदी उपस्थित होते.भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण झाला.

# स्वच्छ सर्वेक्षणाच्या निमित्ताने वैजापूर पालिकेची धावपळ-नागरिकांमध्ये नाराजी!

**वैजापूर । प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेच्या अनुषंगाने वैजापूर शहरात केंद्रीय निरीक्षण पथक दाखल होताच नगरपालिकेची धावपळ सुरू झाली आहे. शहरातील मुख्य रस्त्यांची डागडुजी, मुताऱ्यांची दुरुस्ती आणि कचरा व्यवस्थापन युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, ही स्वच्छतेची लगबग केवळ पुरस्कार मिळवण्यासाठी असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वर्षभर स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणारे पालिका प्रशासन आता केवळ दिखाऊ कामांवर भर देत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.




वैजापूर शहरातील कचऱ्याचे ढीग, दुर्गंधीयुक्त सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि निकृष्ट कचरा व्यवस्थापन या समस्या नवीन नाहीत. मात्र, स्वच्छ सर्वेक्षण पथक शहरात येणार असल्याची माहिती मिळताच पालिकेने निवडक ठिकाणी तातडीने स्वच्छता मोहीम सुरू केली. पथकाच्या फेरफटक्याच्या मार्गावर असलेले रस्ते झाडून स्वच्छ केले जात असून, गेल्या अनेक महिन्यांपासून दुरावस्थेत असलेल्या मुताऱ्या अचानक दुरुस्त केल्या जात आहेत.

पालिकेच्या या तात्पुरत्या हालचालींवर नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. वर्षभर शहरात कचऱ्याचे साम्राज्य असते. सार्वजनिक स्वच्छतागृहांची दयनीय स्थिती महिलांसाठी मोठी अडचण निर्माण करते. मात्र, पुरस्कारासाठीच ही धावपळ सुरू आहे, असे अनेक नागरिकांनी म्हटले आहे. विशेषतः शहरातील महिलांसाठी सार्वजनिक शौचालयांचा अभाव ही गंभीर समस्या आहे. उपलब्ध स्वच्छतागृहांत स्वच्छतेचा अभाव आणि पाणीटंचाई यामुळे महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. पालिकेने या समस्येकडे लक्ष द्यावे, अशी नागरिकांची मागणी आहे.

केंद्रीय पथक येत्या दोन दिवसांत शहरातील स्वच्छतेची स्थिती, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतागृहांची उपलब्धता याचा आढावा घेणार आहे. या सर्वेक्षणाच्या अहवालावर शहराचा स्वच्छता क्रमांक ठरणार आहे. मात्र, पालिकेच्या गडबडीवरून ही कामे फक्त तात्पुरत्या स्वरूपाची असल्याचे नागरिकांचे मत आहे. स्वच्छ सर्वेक्षणानिमित्त केलेल्या कामांवर नागरिक समाधान व्यक्त करत नाहीत. स्वच्छता केवळ निरीक्षण पथकासाठी नसून, ती नियमित असायला हवी, अशी मागणी नागरिक करत आहेत. सार्वजनिक स्वच्छतागृहे, कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसाठी पालिकेने कायमस्वरूपी योजना राबवाव्यात, अन्यथा हा ढोंगीपणा फार काळ टिकणार नाही, असे नागरिकांनी स्पष्ट केले.केंद्रीय पथकाच्या निरीक्षणानंतर वैजापूर नगरपालिकेच्या स्वच्छतेसंबंधीच्या दाव्यांचे वस्तुस्थितीवर आधारित मूल्यमापन होईल. मात्र, खऱ्या अर्थाने शहराची स्वच्छता सुधारायची असेल, तर केवळ सर्वेक्षणाच्या काळात नव्हे, तर वर्षभर पालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे.

# भरधाव कारने दुचाकीस्वार शेतकऱ्याला चिरडले; जागीच मृत्यू

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर-गंगापूर रोडवरील चोरवाघलगाव (ता. वैजापूर) येथे भरधाव वेगाने आलेल्या कारने दुचाकीस्वार तरुण शेतकऱ्याला जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हा दुर्दैवी अपघात शनिवार (२९ मार्च) दुपारी दोन वाजेच्या सुमारास घडला.मृत युवकाचे नाव अमोल बबनराव शिंदे (वय ३४, रा. भगूर, ता. वैजापूर) असे आहे. ते कामानिमित्त शनिवारी दुचाकी (क्र. चक२० उऊ७६२२) घेऊन वैजापूर येथे गेले होते. ते गावाकडे परतत



असताना, चोरवाघल गाव जवळ समोरून भरधाव आलेल्या कारने (क्र. चक१५ ऋङ ५१४७) जोरदार धडक दिली. या अपघातात अमोल शिंदे यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर त्यांचा मृतदेह वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अमोल शिंदे हे आई-वडिलांचे एकमेव आधार होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व एक मुलगा असा परिवार आहे.या घटनेनंतर भगूर येथील गुलाब लक्ष्मण धांडे यांच्या तक्रारीवरून विरगाव पोलिसांनी कारचालक पवन नंदलाल भावसार (रा. साईनगर, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस अंमलदार मनोज कुलकर्णी करीत आहेत.

## रमजान ईद एकता व बंधूतेचा सण-विवेक बोढे

# घुग्घुस येथे रमजान ईद उत्साहात साजरी भाजपा नेत्यांची मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरात सोमवारी रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ईदगाह येथे नमाज अदा झाल्यानंतर भाजपा पदाधिकाऱ्यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

ईद-उल-फितर हा मुस्लिम समाजातील अत्यंत महत्त्वाचा सण असून तो शांती आणि समृद्धीचे प्रतीक आहे, असे मत भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी व्यक्त केले. समाजात एकता, बंधुता आणि सौहार्द



वाढीस लागावा अशा शुभेच्छा देत त्यांनी मुस्लिम समाजासोबत रमजान ईद साजरी केली.यावेळी ईदगाहजवळ पोलिस ठाण्यातर्फे मंडप उभारण्यात आला होता. पोलिस अधिकाऱ्यांनी मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, भाजपाचे विनोद चौधरी, चिन्नाजी नलभोगा, सहायक पोलिस निरीक्षक सचिन तायवाडे, पोलिस उपनिरीक्षक गणेश अनभुले, सुहास विधाते, रवी वाभीटकर, मनोज धकाते आदी उपस्थित होते.

# शब्दसुरांनी सजली देवळीकरांची पाडवा पहाट नवचैतन्याचा गोडवा घेऊन आली वसंताची पहाट

**देवळी । प्रतिनिधी**

पहाटेच्या आल्हादायक वातावरणात त्यात गणरायाच्या भावगीता ने देवळी करांची पाडवा पहाट कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. विश्वहिंदू परिषद प्रेरीत बजरंग दल यांच्या विद्यमाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नव वर्षाच्या शुभ पर्वावर गांधी चौक येथे पाडवा पहाटचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी क्रार्यकमाचे उदघाटन माजी खास. रामदास तडस तर अध्यक्षस्थानी देवळी पुलगाव विधानसभेचे आमदार राजेश बकाने तर प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक मोहन अग्रवाल, देवळीचे ठाणेदार शिंदे, माजी नगराध्यक्षा शोभा तडस, डॉ. नरेद्र मदनकर माजी उपाध्यक्ष,समाजसेवक विनोद घिया, अमित सुराणा, अटल पांडे, आदिची प्रमुख उपस्थिती होती, यावेळी इंडियन ऑयडल फ्रेम राहुल खरे संभाजी नगर यांनी आपल्या वाणीतून माझे माहेर पंढरी, ऐसी लागी लग्न मिरा होगी मगन, नाथा घरी नाचे माझा सखा पाडुरंग, तसेच राष्ट्र संत तुकडोजी




महाराज यांचे घे – घे हरीराम घे माया सारी सोडुन दे. हात नसीबाला रडतो रे ठाई ठाई या संसारा पायी, तू म्हणशील पैसा अडका ते इथेच राहील सड़का माणूस गेल्यावरफक्त राहतो मातिचा हा मडका अशा सुरेल गीताने नविन वर्षाची सकाळ उजळली तर उदघाटन प्रसंगी माजी खास रामदास तडस म्हणाले की राम स्मरणाच गाण सुरु झाल.आणि जशी गाण्याला सुरुवात झाली. त्याच प्रमाणात. अंधारातून आपण दिवसाकडे आलो आणि नविन वर्षाची सुरुवात झाली. आज मराठी नविन वर्षाला सुरुवात होत आहे. तसेच हे नविन वर्ष शेतकर्यांसाठी सुख समुद्धी चे जाव अशी इश्वर चरणी पार्थना करतों तर अध्यक्षीय भाषणात आमदार राजेश बकाने म्हणाले की. बंधूनो हिंदू नववर्षाची सुरुवात आजच्या सुर्याच्या पहिल्या किरणाने झाली. आणि नविन संकल्प नविन आशा घेऊन हा दिवस उजाळला, तसेच आज नविन वर्षाचा पहिला दिवस देवळी च्या विकासाठी संकल्प करून आजचा सुर्य उगवला अस म्हणायला हरकत नाही, पूर्वी एकच इंजन होत आता तडस साहेब आणि मी मिळून डबल इंजन आहे. त्यामुळे तडस साहेब मिळून देवळी करासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवावा आणि सुंदर बगिचा तयार करण्यांचा संकल्प आज या ठिकाणी करतो असे ते म्हणाले.

पाडवा पहाट कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता बजरंग दल तालुका अध्यक्ष मोहन जोशी, सहसंयोजक दिनेश शिरसागर, गोल्डी बघा, अनिल शिरसागर, गजानन महल्ले,प्रवीण तेलरांधे, अमोल गोडबोले भरत पांडे रुपेश गाठे गजानन मेंडुले व समस्त विश्व हिंदू परिषद बजरंग दल कार्यकर्ते यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन विहिरे यांनी तर आभार प्रदर्शन मोहन जोशी यांनी केले.

## श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त रोहा येथे भक्तिमय सोहळा

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात धाटाव एमआयडीसी लगत रोहा-कोलाड रोडवरील बारसोली येथे असलेल्या श्री हनुमान मंदिरात यंदा श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. चैत्र पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर, शनिवार १२ एप्रिल २०२५ रोजी हा उत्सव संपन्न होणार आहे. विशेष म्हणजे, या वर्षी या उत्सवाचे ३० वे वर्ष पूर्ण होत आहे.

यासाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६:२६ वाजता श्री हनुमान अभिषेक व आरतीने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर सकाळी १० वाजता श्री सत्यनारायण महापूजा संपन्न होईल. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भजनाचा कार्यक्रम होणार असून, त्यानंतर ७ वाजता आरती आणि ७ ते ९ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या भक्तिमय सोहळ्यात सहभागी होऊन



पुण्यलाभ घ्यावा, असे आवाहन श्री हनुमान मित्र मंडळ व स्थानिक ग्रामस्थांनी केले आहे.

## स्व.देवेंद्र बुरड यांच्यावर 'देवा'आठवणीतील साहित्य प्रकाशनाच्या मार्गावर

**नाशिक (प्रतिनिधी)**०: नाशिक स्किल हबचे सहकारी स्व. देवेंद्र बुरड यांच्या स्मृतींना अर्पण करत, त्यांच्या कार्याचा गौरव करणारे 'देवा' हे आठवणीतील साहित्य लवकरच प्रकाशित होणार आहे.



बुरड यांनी कौशल्य विकास क्षेत्रात केलेल्या भरीव कार्यासोबतच, त्यांच्या मैत्रीतील निस्सीम जिव्हाळ्याचे आणि कुटुंबासाठी असलेल्या अपार स्नेहभावाचे संवेदनशील आणि समाजप्रबोधनात्मक लिखाण या पुस्तकात मांडले जाणार आहे.या पुस्तकाचे लिखाण नाशिक स्किल हबचे व्यवस्थापक प्रा. राजू रसाळ करत असून, प्रस्तावना सागर क्लासेसचे संचालक प्रा. सुनील रूणवाल यांनी लिहिणार आहेत. तसेच, मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ रचना नाशिक स्किल हबचे सर्वेसर्वा इंजि. जयवंत नलावडे करणार आहेत.विशेष म्हणजे, स्व. देवेंद्र बुरड यांच्या जयंती दिनी, ११ जुलै २०२५ रोजी हे पुस्तक प्रकाशित होणार आहे. त्यांच्या आठवणींना उजाळा देणारे हे साहित्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी आणि कौशल्य विकास क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरेल.

## उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे आवाहन

### अंतिम मुदत ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसविण्याची अंतिम मुदत ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे वाहनधारकांनी वेळेत ही नोंदणी क्रमांक पाटी बसवून घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी केले आहे.



सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि वाहन ओळख प्रक्रियेला अधिक बळकटी देण्यासाठी सरकारने ही उच्च सुरक्षा क्रमांक पाटी सक्तीची केली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३,९६० वाहनांना क्ष्ठझ बसविण्यात आली असून, २०,३२७ वाहनधारकांनी ऑनलाइन अर्ज सादर केला आहे. तथापि, अजूनही अनेक वाहनधारकांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही.याकरिता वाहनधारकांनी लवकरात लवकर अधिकृत वेबसाईटवर जाऊन अर्ज भरावा आणि आपल्या वाहनावर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवून घ्यावी. अंतिम मुदतीनंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

परिवहन विभागाच्या या उपक्रमामुळे वाहतुकीच्या व्यवस्थापनास मदत होणार असून, वाहन चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळविण्यातही हातभार लागेल. त्यामुळे सर्व वाहनधारकांनी ह्या नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## उंभरे ते दिघावे रस्त्याची दुर्दशा–लोकप्रतिनिधी आणि बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाबद्दल नागरिकांमध्ये संताप

> **स्थानिक आमदार मंजुळाताई गावित यांनी स्वत: लक्ष घालून हा प्रश्न तातडीने सोडवावा. आम्ही त्यांना भरघोस मतदान केले आहे, त्यामुळे त्यांनी आमच्या रस्त्याचा प्रश्न तात्काळ सोडवला पाहिजे. अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन छेडावे लागेल.**
> **– कमलेश शेवाळे, उंभरे ग्रामस्थ**



**धुळे । उमाकांत अहिरराव**

साक्री तालुक्यातील उंभरे ते दिघावे रस्त्याची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. या मार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांचे हाल होत असून, रोज अपघाताच्या घटना घडत आहेत. या रस्त्यावरून दैनंदिन वाहतूक मोठ्या प्रमाणात होते, तसेच दिघावे गाव आठवडे बाजारासाठी महत्त्वाचे ठिकाण असल्याने परिसरातील नागरिकांचा या मार्गावरून मोठा वावर असतो.

गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता सुधारला जाईल, अशी आश्वासने दिली जात आहेत, मात्र अद्यापही प्रत्यक्षात कोणतेही ठोस पाऊल उचललेले नाही. निवडणुकीच्या काळात खासदारांपासून पंचायत समिती सदस्यांपर्यंत अनेक लोकप्रतिनिधींनी याच रस्त्यावरून प्रचार फेऱ्या काढल्या, मात्र त्या वेळी असलेली रस्त्याची दुरवस्था आजही कायम आहे. मागील वर्षी तात्पुरती मलमपट्टी करण्यात आली होती, परंतु अवघ्या दोन महिन्यांत ती निघून रस्त्याची स्थिती पुन्हा जैसे थे झाली.लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे त्वरित लक्ष देऊन रस्त्याच्या कामास गती द्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

## आदिनाथ साखर कारखाना निवडणूक


## जयवंतराव जगताप यांची बिनशर्त माघार, दोन गटांमध्ये थेट लढत

**सोलापूर । प्रतिनिधी**

श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या २०२५ निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू असून, या पार्श्वभूमीवर महत्त्वाचे राजकीय घडामोडी घडत आहेत. काल बागल गटाचे नेते व मार्गदर्शक विलासराव घुमरे यांनी आपली भूमिका स्पष्ट करत आदिनाथची निवडणूक न लढवण्याचा निर्णय जाहीर केला.

आज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयवंतराव जगताप यांनी देखील आपली भूमिका स्पष्ट केली असून, कसलीही अट न लावता त्यांनी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाचे स्वागत सर्वसामान्य कार्यकर्त्यांतून होत आहे. विशेष म्हणजे, सुरुवातीपासूनच बिनविरोध निवडणुकीसाठी जगताप यांनी पुढाकार घेतला होता.

या घडामोडींमुळे आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीत माजी आमदार संजय शिंदे आणि विद्यमान आमदार नारायण पाटील या दोन गटांमध्ये थेट लढत होण्याची शक्यता आहे. दरम्यान, शंभूराजे जगताप यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत विचारले असता त्यांनी पोलिस अधिकारी विनोद घुगे यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली.



## वर्धा पोलिसांची मोठी कारवाई अवैध पशुवाहतूक करणारे ५ ट्रक जप्त

### १ करोड लाख ११ हजारांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा । प्रतिनिधी**

हिंगणघाट तालुक्यातील नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील वडनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दारोडा टोलनाका परिसरात वर्धा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई करत जनावरांची निर्दयतेने वाहतूक करणारे पाच ट्रक जप्त केले. या कारवाईत एकूण ७९ जनावरांची सुखरूप सुटका करण्यात आली असून, एकूण १ कोटी ७ लाख ११ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वर्धा येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध व्यवसायांविरोधात सुरू केलेल्या गस्तीदरम्यान ही कारवाई केली. गुप्त माहितीनुसार ही वाहतूक सुरू असल्याचे समजताच पोलिसांनी नाकाबंदी करत संशयित ट्रकांना थांबवले. तपासणी केल्यावर ट्रकमध्ये निर्दयतेने कोंबून नेली जात असलेली जनावरे आढळली. यानंतर पोलिसांनी त्वरित कारवाई करत पाचही ट्रक ताब्यात घेतले आणि ७९ जनावरांची सुखरूप सुटका केली.

या कारवाईत मोठ्या प्रमाणावर अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास वर्धा पोलिसांकडून सुरू असून, या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का, याचीही चौकशी करण्यात येत आहे.या कारवाईमुळे जिल्ह्यात अवैध पशुवाहतुकीवर मोठा आळा बसणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या या तत्पर कारवाईचे कौतुक केले असून, अवैध धंद्यांविरोधात पोलिसांनी अशाच कठोर उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणीही केली जात आहे.

## श्रीक्षेत्र कोल्हार येथे श्रीराम नवमी व कैकाडी महाराज जयंती निमित्त संगीतमय शिवमहापुराण कथा भक्तिमय वातावरणात सुरू

**कोल्हार । प्रतिनिधी**

श्रीराम नवमी उत्सव तसेच राष्ट्रीय संत कैकाडी महाराज जयंती निमित्त श्रीक्षेत्र कोल्हार येथे संगीतमय श्री शिवमहापुराण कथा भक्तिभावाने सुरू झाली. श्रीराम जन्मोत्सव समिती व सकल हिंदू समाजाच्या वतीने सोमवार, ३१ मार्च २०२५ ते रविवार, ६ एप्रिल २०२५ या कालावधीत या कथाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री भगवती माता मंदिरासमोरील प्रांगणात असंख्य भक्तांच्या उपस्थितीत, सुप्रसिद्ध कथाकार ह. भ. प. नवनाथ महाराज म्हस्के (सद्गुरु नारायणगिरीजी महाराज गुरुकुल, बाभळेश्वर) यांच्या सुश्राव्य आवाजात या कथेला प्रारंभ झाला. उद्घाटनप्रसंगी कोल्हार बु. चे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र पाटील खर्डे यांच्या हस्ते प्रतिमा आणि ग्रंथ पूजन करण्यात आले. यानंतर त्यांच्या हस्ते शिव कथाकार ह. भ. प. नवनाथ महाराज म्हस्के यांचा सत्कार करण्यात आला.प्रथम दिवस सप्तनिक ग्रंथ व प्रतिमा आरतीचा मान श्री निलेश राऊत, सुनिल राऊत, भरत घुले तसेच पत्रकार गणेश सोमवंशी यांना मिळाला.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवरा सहकारी साखर कारखान्याचे संचालक स्वप्निल भाऊ निबे, कोल्हार भगवतीपुरचे माजी सरपंच रावसाहेब कमळाजी खर्डे, भगवती माता देवालय ट्रस्टचे विश्वस्त वसंतराव खर्डे, ऋषिकेश खांदे, कोल्हार बुद्रुकचे माजी उपसरपंच ज्ञानेश्वर खर्डे, तसेच देवालय ट्रस्टचे विश्वस्त अजित मोरे, केतन लोळगे, विजय डेंगळे आदींचा समावेश होता.या धार्मिक कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहून भक्तिमय वातावरण अनुभवले.



गंगाखेड येथील ईदगाह मैदानात रमजान ईद निमित्त सामूहिक नमाज अदा करताना मुस्लिम बांधव. (छायाचित्र: सुधबोधन भालेराव, गंगाखेड, परभणी)

### गुन्हा मागे न घेतल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

# शंभूराजे जगताप यांच्यावर बोगस गुन्हा दाखल-शिवसेनेकडून तीव्र निषेध

## अधिकाऱ्यांची मनमानी मोडून काढू-महेश चिवटे यांचा इशारा

**सोलापूर । प्रतिनिधी**

किरकोळ घरगुती कामासाठी सीना नदीतून एक पोते वाळू आणणाऱ्या शेतकऱ्याकडून २५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या पोलिसाला विरोध केल्याच्या कारणावरून शंभूराजे जयवंतराव जगताप यांच्यावर पोलिसांनी बोगस गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा शिवसेनेकडून तीव्र निषेध नोंदवण्यात आला असून, मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या वाळू तस्करीकडे प्रशासन आणि पोलिस दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी म्हटले आहे की, उजनीच्या पात्रातून दररोज १०० ते १५० टिप्पर वाळू चोरी होत असताना पोलिस आणि महसूल प्रशासन गप्प आहे. नगर जिल्ह्यातील पात्रातून करमाळ्यात ३० ते ४० ट्रक वाळू पोहोचते, त्याकडे प्रशासन लक्ष देत नाही. मात्र एका शेतकऱ्याने घराशेजारील नदीतून थोडी वाळू आणल्यावर त्याच्यावर कठोर कारवाई केली जाते. हा स्पष्ट अन्याय असून, शिवसेना या प्रकरणात शंभूराजे जगताप यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे.

सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींनी अन्यायाविरोधात आवाज उठवला तर त्यांच्यावरच गुन्हे दाखल होतात, ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक आहे. या प्रकरणाची चौकशी करून खोटी फिर्याद देणाऱ्या पोलिस आणि तलाठ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, तसेच शंभूराजे जगताप यांच्यावर दाखल केलेला गुन्हा तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

महेश चिवटे यांनी करमाळा तालुक्यात सुरू असलेल्या भ्रष्टाचारावरही प्रकाश टाकला. सर्वच शासकीय कार्यालयांत पैसे दिल्याशिवाय कोणतेही काम होत नाही. दारू, मटका, जुगार, गुटखा, ट्राफिक एन्ट्रीसह नशेच्या इंजेक्शन्सचा खुलेआम व्यवहार सुरू आहे. सिटी सर्वे ऑफिसपासून खरेदी-विक्री कार्यालयांपर्यंत दलालांचे जाळे पसरले आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि सार्वजनिक बांधकाम विभागात पैशाशिवाय काम होत नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

करमाळ्यातील लोकप्रतिनिधी प्रशासनावर प्रभाव टाकण्यात अपयशी ठरत आहेत. अनेक अधिकाऱ्यांनी इथे येऊन अवैध मार्गाने संपत्ती कमावली आहे. एक अधिकारी दुचाकीवर येतो आणि चारचाकी गाडीतून जातो, यावरूनच परिस्थिती स्पष्ट होते,असे मतही त्यांनी मांडले.

शंभूराजे जयवंतराव जगताप यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, माझ्यावर खोटा कलम ३५३ चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मी करमाळा शहरातच आहे. पोलिसांनी मला अटक करून तुरुंगात टाकावे, म्हणजे खऱ्या अधिकाऱ्यांचा चेहरा जनतेसमोर उघड होईल.या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अन्यायकारक गुन्हा मागे घ्यावा, अन्यथा मोठ्या आंदोलनाचा इशारा शिवसेनेने दिला आहे.



### जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या ११ व्या वर्धापन दिन सोहळ्यात

# सुवणी रंगारी यांना सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्रदान

**नागपूर । वैभव शहाणे**

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ च्या वतीने ११ व्या वर्धापन दिन समारंभाचे भव्य आयोजन नागपूर येथे करण्यात आले. या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार श्रीमती सुवणी रंगारी यांना त्यांच्या अपार सामाजिक कार्यासाठी प्रदान करण्यात आला.हा कार्यक्रम विदर्भ हिंदी साहित्य संमेलन, मधुरम सभागृह, दुसरा माळा, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. पुरस्कार वितरण समारंभाचे उद्घाटन आर्यवृत्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, त्रिपुरा च्या कुलगुरू डॉ. प्रकाश करमाडकर यांच्या हस्ते झाले. पुरस्कार प्रदान करण्याचा मान महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई चे सदस्य डॉ. राजेश गायकवाड यांनी घेतला.




कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. जगन कराडे (समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), डॉ. सुनील रामटेके (सुप्रसिद्ध नाटककार व साहित्यिक, मुंबई), डॉ. विलास तायडे (सुप्रसिद्ध साहित्यिक, अकोला), डॉ. विद्याधर बन्सोड (सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत, चंद्रपूर), डॉ. विजय शेगोकार (विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई) आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री बबिता डोळस (नागपूर) यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. दीपककुमार खोब्रागडे, अध्यक्ष जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, हे होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. भूपेश पाटील यांनी केले, तर सूत्रसंचालनाची धुरा डॉ. अनिल काळबांडे आणि डॉ. शंकर चांदेकर यांनी समर्थपणे सांभाळली. समारंभाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत डॉ. रविंद्र तिरपुडे यांची उपस्थिती होती, ज्यांनी कार्यक्रमाचे अदा आणलेल्या उत्तम भूमिकेने आकर्षक रूप दिले. सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार श्रीमती सुवणी रंगारी यांना त्यांच्या योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे त्यांच्यावरील सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्या क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांना एक महत्त्वपूर्ण प्रेरणा मिळाली.सोहळ्यात याव्यतिरिक्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये संगीत व नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. हे सर्व सादरीकरण एक समृद्ध आणि प्रबोधनात्मक वातावरण निर्माण करणारे ठरले.

## इको पार्क पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे केंद्र : पंकज भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षण आणि निसर्गस्नेही विकासाला चालना देणारा इको पार्क हा प्रकल्प भविष्यात रोजगार निर्मितीसाठीही महत्त्वपूर्ण ठरेल, असे मत राज्याचे गृह (ग्रामिण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी व्यक्त केले.इको पार्कच्या सौंदर्यीकरण व विकासकामांच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. त्यांनी नमूद केले की, इको पार्क हे केवळ एक निसर्गरम्य स्थळ नसून पर्यावरणीय जागरूकतेसाठी प्रेरणादायी केंद्र ठरेल. हरित आणि सशक्त पर्यावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक निधी कमी पडू दिला जाणार नाही.

याचबरोबर, पिपल्स फॉल निमल संचालित गोशाळा गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असून, ती गाईंच्या संरक्षण व उत्तम देखभालीसाठी तसेच दुग्ध उत्पादनाला चालना देण्यासाठी आदर्श केंद्र ठरेल. यामुळे स्थानिक स्तरावर रोजगार संधीही उपलब्ध होतील.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात सुहास बढेकर यांनी २०१६-१७ मध्ये इको पार्कची संकल्पना मांडली गेल्याचे सांगितले. या प्रकल्पासाठी ३ कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, संरक्षणात्मक सिमेंट रस्ते आणि सौंदर्यीकरणाच्या विविध विकासकामांचा समावेश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# रस्त्यांच्या कामांसंदर्भात उच्चस्तरीय बैठक

## खा.नीलेश लंके यांनी घेतला आढावा



**पारनेर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात निवडणूकीदरम्यान दिलेल्या विकास कामांची पुर्तता करण्यासाठी विविध भागांतील रस्ते आणि महामार्गांच्या कामांना गती देण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत खा. नीलेश लंके यांनी विविध कामांचा आढावा घेतला. नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, तांत्रीक तज्ञ, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत छत्रपती संभाजीनगर-पुणे ग्रीन फिल्ड महामार्ग, सुरत-चेन्नई महामार्ग, पैठण पालखी मार्ग आणि इतर महत्वाच्या रस्ते प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पांमध्ये येणाऱ्या अडचणी, निधी वितरण, विविध प्रकारच्या परवाणग्या, तांत्रीक बाबी आणि जमीनींचे अधिग्रहण याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. कामांमध्ये येणारे अडथळे दुर करून कामांना गती देण्यासाठी अधिकाऱ्यांना खा. लंके यांनी यावेळी ठोस सुचना दिल्या.

बैठकीस मा. नगरसेवक दीप चव्हाण, योगीराज गाडे, गिरीश जाधव, प्रकाश पोटे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंधेकर, साईट इंजिनिअर ओंकार देवकर, कार्यकारी अभियंता शेवाळे, सर्व्हेअर मुजीफ सयद, महेश मिश्रा, निवासी अभियंता अलोक सिंग, शाखा अभियंता शोएब फकीर, उपविभागीय अभियंता अजित गायके, घटमल, राखाडे व इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. राहुरी-बारगांव नांदूर-जांभळी-वावरथ-भोकरदरा-ढवळपुरी हा नगर-कल्याण महामार्गाला जोडणारा रस्ता, राहुरी येथे बायपास अथवा फलाय ओव्हर ब्रीज उभारणी, नगर शहरातील पत्रकार चौक ते सहयाद्री चौकादरम्यान फ्लाय ओव्हर ब्रीज, आढळगांव ता. श्रीगोंदा येथे रेल्वे ओव्हरब्रीज आदी महत्वाच्या विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. पैठण-मोहरी-खर्डा या ५५ कि. मी. लांबीच्या पालखी मार्गाचे काम वारकऱ्यांसह शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाचे असल्याने हे काम गुणवत्तापुर्ण व वेळेत पुर्ण करण्याचे निर्देश यावेळी खा. लंके यांनी दिले. काही प्रकल्पांमध्ये अडथळे येत असल्यास त्यासंदर्भात केंद्र सरकारकड पाठपुरावा करून ते दुर करण्यात येतील. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत स्वतंत्र बैठकीचे आयोजन करण्यात येईल. कामे दर्जेदार व वेळेत होण्यासाठी नियमित आढावा बैठक घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच शैक्षणिक परिवर्तनाचा मूलमंत्र-पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

**वर्धा । प्रतिनिधी**

देशाची भावी पिढी घडवण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी शिक्षकांवर असून, शिक्षणाच्या दर्जात वाढ करण्यासाठी केवळ ज्ञानपूरक अध्यापन नव्हे, तर नैतिक मुल्यांची जोड देणेही तितकेच आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील खाजगीकरणाच्या वाढत्या स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्तापूर्ण, तंत्रस्नेही आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा स्वीकार करणे हाच परिवर्तनाचा मूलमंत्र आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी., शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मनिषा भंडग, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नितू गावंडे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानदा फणसे आदी उपस्थित होते.



शासकीय शाळा बंद होण्याची भीती अनाठायी असून, शासन शासकीय शाळांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. त्यामुळे शिक्षकांनी खाजगी शाळांसोबत गुणवत्तेच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून अध्यापन पद्धती विकसित करावी, असे आवाहन ना. भोयर यांनी केले.


या कार्यक्रमात २०२३-२४ मध्ये आयोजित व्हिडिओ स्पर्धेत सहभाग घेतलेल्या ७५० शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील १७ पीएमसी शाळांतील शिक्षकांना शिक्षणसाहित्य आणि 'मिशन समृद्धी' अंतर्गत विज्ञान संचांचे वितरण ना. भोयर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांनी केले.

# जिवंत सातबारा मोहिमेस शेतकऱ्यांचे सहकार्य आवश्यक-जिल्हाधिकारी वान्मथी सी

**वर्धा । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यांतर्गत मयत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद वेळेत न झाल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या समस्येच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यासह वर्धा जिल्ह्यात १ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत जिवंत सातबारा मोहिम राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन आपल्या वारसांची नोंद वेळेत करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे.या मोहिमेअंतर्गत खातेदारांच्या वारसांची नोंदणी तातडीने केली जाईल, त्यामुळे भविष्यात शेतजमिनीशी संबंधित व्यवहारांमध्ये अडथळे येणार नाहीत. शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तलाठी कार्यालय किंवा तहसील कार्यालयात संपर्क साधावा आणि मोहिमेचा लाभ घ्यावा, असेही जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .